सुविचार

महान कार्य करने के लिए उमंग
–उत्साह को अपना साथी बनाइये ।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. २३ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

भाजपची चौथी यादी

नवी दिल्ली : भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. या यादीत एकूण १५ जागांसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे या यादीत महाराष्ट्रातील एकाही जागेचा समावेश नाही.

भाजपच्या या चौथ्या यादीत पुदूच्चेरी तसेच तमिळनाडू राज्यातील १४ जागांचा समावेश आहे. भाजपने या यादीत तमिळनाडूतील प्रसिद्ध अभिनेत्री राधिका सरथकुमार यांना तिकीट दिले आहे. त्या विरुदनगर येथून निवडणूक लढवणार आहेत.

तिसऱ्या यादीत ९ जणांचा समावेश

याआधी भाजपने २१ मार्च रोजी आपल्या उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली होती. या यादीत एकूण ९ उमेदवारांचा समावेश होता. यामध्ये तमिळनाडूचे भाजपचे नेते तथा माजी आयएएस अधिकारी के. अण्णामलाई यांच्या नावाचा समावेश होता. ते कोईंबतूर येथून निवडणूक लढवणार आहेत. तिसऱ्या यादीमध्येदेखील तामिळनाडूच्या मतदारसंघांचाच समावेश होता. भाजप हा देशातील प्रमुख पक्षांपैकी एक पक्ष आहे. हा सत्ताधारी पक्ष असल्यामुळे त्याच्या प्रत्येक जागेवरील उमेदवाराकडे लोकांचे लक्ष आहे.

दुसऱ्या यादीत ७२ जणांची नावे

ज्या मतदारसंघांवर कोणताही वाद नाही किंवा मित्रपक्षांचा दावा नाही, अशाच मतदारसंघांसाठी उमेदवारांची घोषणा भाजपकडून केली जात आहे. भाजपच्या दुसऱ्या यादीत अशा ७२ मतदारसंघांचा समावेश होता. यामध्ये पीयुष गोयल, अनुराग ठाकुर, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोरहलाल ठक्कर, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नावांचा समावेश होता.

पहिल्या यादीत १९५ जणांची नावे

भाजपने २ मार्च रोजी आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. या यादीत देशभरातील एकूण १९५ मतदारसंघांचा समावेश होता. यात मोदी सरकारमध्ये **(पान ७ वर)**

शरद पवार गटाच्या संभाव्य ९ उमेदवारांची यादी जाहीर

मुंबई : काँग्रेसने गुरुवारी सात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर शरद पवार गटाची एक संभाव्य यादी पुढे येत आहे. या यादीमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघासह बीड, माढा, शिरुर, दिंडोरी, वर्धा या जागांचे उमेदवार ठरल्याचे सांगितले जात आहे.

शरद पवार गटाची ९ जणांची पहिली यादी जाहीर होऊ शकते. यामध्ये बारामती, माढा, रावेर, सातारा, शिरुर, नगर दक्षिण, दिंडोरी, बीड, वर्धा या समदारसंघांचा समावेश आहे. हे मतदारसंघ शरद पवार गटाकडे जावू शकतात.

बारामती- सुप्रिया सुळे, माढा- महादेव जानकर (रासप), सातारा- बाळासाहेब पाटील किंवा श्रीनिवास पाटील, शिरुर- अमोल कोल्हे, नगर दक्षिण- निलेश लंके, बीड- बजरंग सोनवणे किंवा ज्योती मेटे, वर्धा- अमर काळे.

दरम्यान, बीडच्या जागेवरुन राज्यामध्ये उलटसुलट चर्चा सुरु आहे. बजरंग सोनवणे यांनी शरद पवार गटामध्ये प्रवेश केल्यानंतर तेच लोकसभेचे उमेदवार असतील, असे सांगितले **(पान ७ वर)**

महायुतीची आज पुन्हा दिल्लीमध्ये बैठक

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे ४०० पार जाण्यासाठी अतोनात प्रयत्न सुरु आहेत. महाराष्ट्रातही महायुतीने यासाठी चांगलाच जोर लावला आहे. त्यासाठी महायुतीच्या सातत्याने बैठकाही होत आहेत. त्यातच आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचंही नाव महायुतीसोबत जोडलं जात आहे. या युतीबाबत राज ठाकरे यांनी स्वतः जाहीर भाष्य केलेलं नसलं तरीही महायुती त्यांच्या स्वागतासाठी उत्सुक आहे. तसेच मागील काही दिवसांमध्ये राज ठाकरे यांनीही महायुतीच्या बैठकांना हजेरी लावली आहे.

यानंतर आज पुन्हा एकदा दिल्लीमध्ये महायुतीची महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज ठाकरेही हजेरी लावणार असल्याचे समजत आहे. राज ठाकरेंच्या उपस्थितीत दिल्लीमध्ये महायुतीची ही दुसरी बैठक पार पडणार आहे. त्यामुळे या बैठकीत नेमकं काय होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना म्हणजेच मनसे महायुतीत सहभागी होण्याबाबत राजकीय वर्तुळातील चर्चांनी जोर धरला आहे. भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शाह **(पान ७ वर)**

राहुल गांधीची केजरीवालांना कायदेशीर मदत

नवी दिल्ली : दिल्लीच्या अबकारी कर धोरणातील कथित आर्थिक घोटाळा प्रकरणी ईडीने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केली. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मोदी सरकारने रचलेले हे कट-कारस्थान असल्याचा आरोप ङ्गआपफ्ने केला आहे.

पण आता काँग्रेस नेते राहुल गांधी हे केजरीवाल यांच्या मदतीला धावून गेले आहेत, त्यांना कायदेशीर मदत करणार आहेत. केजरीवालांच्या कुटुंबियांशी फोनवरुन संवाद साधत त्यांनी धीर देण्याचे काम केले आहे.

केजरीवालांच्या अटकेनंतर राहुल गांधींनी ट्विटरवर पोस्ट केली. यामध्ये त्यांनी म्हटले की, घाबरलेला हुकुमशहा एक मेलेली लोकशाही तयार करतो. मीडियासह सर्व संस्थांवर कब्जा, राजकीय पक्षांची तोडफोड, कंपन्यांकडून हप्ता वसुली, प्रमुख विरोधीपक्षांची खाती गोठवणे देखील आसुरी शक्तीसोबत हा हुकुमशाहा काम करत होता.

आता तर निवडून आलेल्या मुख्यमंत्र्यांना अटक होणे ही सर्वसाधारण बाब बनली आहे. इंडिया आघाडी याला सडेतोड उत्तर देईल अशा आक्रमक शब्दांत राहुल गांधींनी नाव न घेता थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. **(पान ७ वर)**

इस्त्रोच्या पुष्पक विमानाची चाचणी यशस्वी

चित्रदुर्ग : इस्रोने आपल्या पुष्पक या रीयूजेबल लाँच व्हीकलची चाचणी यशस्वीपणे पूर्ण केली. कर्नाटकातील चित्रदुर्ग येथील एअरोनॉटिकल टेस्ट रेंजमध्ये सकाळी ७:१० च्या सुमारास पुष्पकचे यशस्वी लँडिंग झाले. हे ऐतिहासिक यश असल्याचे इस्रोने म्हटले आहे. हे पुष्पक विमान ऑटोमॅटिकली सुरक्षितपणे लँड झाले.

पुन्हा वापर करता येणारे लाँच व्हीकल तयार केल्यामुळे अंतराळ मोहिमांवरील खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. लाँच व्हीकलमध्ये असणारी यंत्रे, पाटर्स अत्यंत महागडे असतात. आतापर्यंत एकदा प्रक्षेपित केलेले यान पुढे अंतराळातच सोडून द्यावे लागत होते. मात्र, आता या चाचणीनंतर हे यान पृथ्वीवर पुन्हा आणता येईल अशी खात्री झाली आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून इस्रो रीयूजेबल लाँच व्हीकल बनवण्यासाठी प्रयत्न करत आहे. यापूर्वी दोन वेळा अशा रॉकेटचे यशस्वी लँडिंग देखील करण्यात आले आहे. गेल्या वर्षी अशा एका आरएलव्हीला वायुदलाच्या चिनुक हेलिकॉप्टरमधून सोडण्यात आले होते. सुमारे साडेचार किलोमीटर उंचीवरुन खाली पडलेले हे व्हीकल सुरक्षितपणे रनवेवर लँड झाले होते.

रीयूजेबल लाँच व्हीकलची पहिली चाचणी २३ मे २०१६ रोजी श्रीहरीकोटा येथे पार पडली होती. यानंतर काळानुसार त्यामध्ये भरपूर बदल करण्यात आले. आजच्या चाचणीमध्ये पुष्पक विमान पूर्णपणे स्वयंचलितपणे रनवेवर लँड झाले. पॅराशूट, लँडिंग गिअर ब्रेक आणि नोज व्हील स्टिअरिंग सिस्टीम या सर्व यंत्रणा ऑटोमॅटिकली कार्यान्वित झाल्या आणि हे विमान आरामात लँड झाले.

अंतराळातील कचरा होणार कमी या रियूजेबल लाँच व्हीकलचा फायदा केवळ इस्रोलाच होईल असे नाही. लाँच व्हीकल पुन्हा जमीनीवर आणता येणे शक्य झाल्यामुळे अंतराळातील कचरा देखील कमी होण्यास मदत मिळेल. यामुळे सर्वांनाच मोठा फायदा होणार आहे.

ओडिशात युती फिस्कटली

भुवनेश्वर : वृत्तसंस्था - भुवनेश्र्वर आणि दिल्लीत अनेक चर्चा झाल्यानंतर ओडिशामध्ये बीजेडी आणि भाजपने युती न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ओडिशाचे भाजप प्रदेशाध्यक्ष मनमोहन सामल यांनी २१ लोकसभा मतदारसंघ आणि १४७ विधानसभेच्या जागा भाजप स्वबळावर लढेल, अशी घोषणा केली.

सामल यांनी नवीन पटनायक यांच्या नेतृत्वाखालील बीजेडीने केंद्रातील भाजप सरकारला महत्त्वाच्या क्षणी पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले. परंतु ओडिशा लोकांच्या हितसंबंधित अनेक मुद्यांवर भाजप बीजेडी सरकारशी सहमत नाही, असे सांगितले. बीजेडीकडून समल यांच्या विधानावर शुक्रवारी संध्याकाळपर्यंत कोणतीही प्रतिक्रिया आली नसली तरी पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की, ते स्वबळावर लढण्यास तयार आहेत.

भाजप आणि बीजेडीच्या विधानसभेच्या जागावाटपाच्या मुद्यावरून बोलणी फिस्कटली. बीजेडीला १४७ पैकी १०० पेक्षा कमी विधानसभेच्या जागांवर निवडणूक लढवायची नव्हती, ज्या राज्यात त्यांची उपस्थिती आहे. मात्र भाजपने जवळपास ५७ जागांवर आग्रह धरला. निवडणुकीनंतरच्या सत्तेच्या वाटणीच्या सूत्रावरही पक्षांचे एकमत **(पान २ वर)**

खडसे दाम्पत्यांना जामीन मंजूर

मुंबई : पिंपरी-चिंचवडमधील कथित भोसरी एमआयडीसीतील भूखंड घोटाळाप्रकरणी खडसे

कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. एकनाथ खडसे यांच्यासह पत्नी आणि जावयाला कोर्टाने नियमित जामीन मंजूर केला आहे.

एकनाथ खडसे, मंदाकिनी खडसे आणि गिरीश चौधरी या तिघांना नोव्हेंबर २०२३ मध्ये हायकोर्टानं अंतरिम जामीन मंजूर केला होता. त्यानंतर आता त्यांना नियमित स्वरुपाचा अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे खडसे कुटुंबियांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे. खडसे हे महसूल मंत्री असताना त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांनी २०१६ मध्ये भोसरीतील एमआयडीसीमध्ये एक भूखंड खरेदी केला होता. बाजारभावापेक्षा अगदी कमी किमतीत हा भूखंड खरेदी केल्याचा आरोप त्यांच्यावर **(पान ७ वर)**

पादचाऱ्यांच्या अंगावर रंग, पाणी उडविल्यास होणार कारवाई

मुंबई : मोठ्या उत्साहात साजऱ्या करण्यात येणाऱ्या होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी कोणतीही अनुचीत घटना घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. तसेच, पोलिसांनी गस्तीवर भर दिलेला आहे. दुसरीकडे, सार्वजनिक ठिकाणी अंधाधुंदपणे रंगीत पाणी, रंग उडविणे आणि अश्लिल टीका टिप्पणी केल्यास थेट कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

मुंबईतील गर्दीची ठिकाणे मॉल्स, बाजारपेठा, धार्मिक स्थळे आणि चौपाट्यांवर सीसीटिव्हींच्या माध्यमातून करडी नजर ठेऊन महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथकांकडून गस्त घालण्यात येत आहे. साध्या गणवेशातील पोलीसही सर्व घडामोडीवर लक्ष ठेवून असणार आहे. दुसरीकडे निर्भया पथकाकडून गस्त सुरूच असून, काहीही मदत लागल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहनही पोलिसांकडून करण्यात येत आहे. नियंत्रण कक्षातून सर्व घडामोडीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सार्वजनिक ठिकाणी अंधाधुंदपणे रंगीत पाणी शपिंडणे आणि अश्लिल बोलणे यामुळे जातीय तणाव आणि सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता असते. २३ मार्च ते २९ मार्च दरम्यान

अश्लील टीका टिप्पणी, गाणे, तसेच अश्लील इशारे, फलकांचा वापर करू करू नये. पादचाऱ्यांवर **(पान ७ वर)**

चहल मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त सचिवपदी नियुक्ती

मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त पदावरुन बदलीनंतर इक्बालसिंह चहल यांची आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अतिरिक्त सचिव पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार तीन वर्षांपेक्षा एका पदावर, जिल्ह्यात किंवा मूळ गाव असलेल्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या निवडणुकीच्या कामाशी संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे सर्वसाधारण आदेश आयोगाने दिले होते. या आदेशानुसार इक्बालसिंह चहल, अश्विनी भिडे आणि पी.वेलारासू यांची बदली करणे बंधनकारक झाले.

मुंबई मनपाच्या आयुक्तपदी नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त आयुक्तपदी काम केलेल्या भूषण गगराणी यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर आज इक्बालसिंह चहल यांची मुख्यमंत्री शिंदे यांच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. इक्बालसिंह चहल यांनी मुंबईच्या आयुक्तपदी काम करताना राजकीय स्थित्यंतरे अनुभवली आहेत. तसेच दोन्ही वेळच्या सत्ताधाऱ्यांशी जुळवून घेणारे **(पान ७ वर)**

भरारी पथके, चेक पोस्टच्या माध्यमातून आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करा

लातूर, दि. २० : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात लागू असून या आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके, चेक पोस्ट स्थापन करण्यात आले आहेत. याकरिता नियुक्त सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आज येथे केल्या.

आदर्श आचारसंहिता कक्ष आणि सी व्हिजील प, मतदान केंद्रांवरील कायदा व सुव्यवस्था यासह निवडणूक आयोगामार्फत कार्यान्वित विविध पच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. आदर्श आचारसंहिता कक्षाचे प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, संगीता टकले यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

भरारी पथकांनी आपल्या कार्यक्षेत्रात कोणत्या ठिकाणी आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास किंवा कोणताही गैरप्रकार होत असल्यास त्याची तातडीने दखल घेवून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच चेक पोस्टवर तैनात करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वाहनांची तपासणी करून रोकड, मद्य यासह इतर प्रतिबंधित **(पान ७ वर)**

भाजपाचे शृंगारे यांना लातूर ग्रामीण विधानसभेतून साठ हजाराचे मताधिक्यासाठी प्रयत्न करावेत

भारतीय जनता पार्टी, लातूर

लातूर : प्रतिनिधी- लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपाचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर साठ हजाराहून अधिक मताधिक्य मिळावे यासाठी भाजपाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीं यांनी जिद्दीने प्रयत्न करावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे सुपर वॉरियर्स, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्याची बैठक गुरुवार २१ मार्च रोजी भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, पंचायत राज आघाडीचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, रेणापूर तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, जिल्हा उपाध्यक्ष हनुमंतबापू नागटिळक, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

आजपर्यंत भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रदेश भाजपा पक्षाचे सर्व कार्यक्रम प्रभावीपणे राबवून यशस्वी केले. येणारा काळ निवडणुकीचा असून खा. सुधाकर शृंगारे यांनी गेल्या पाच वर्षात निस्वार्थ भावनेतून केलेल्या कामाची दखल घेऊन केंद्रीय पक्षश्रेष्ठींनी पुन्हा उमेदवारी दिली आहे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी अनेक गोरगरिब जनतेच्या हिताच्या योजना सुरू केल्या गरजू लाभार्थ्यांना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ दिला. अनेक ऐतिहासिक निर्णय घेऊन वर्षानुवर्ष **(पान ७ वर)**

यशवंत
धाराशिव जिल्हा
शनिवार दि. २३ मार्च २०२४
☎कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

कविता दिवसनिमित्त रंगले कलाविष्कार कवी संमेलन

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) – २१ मार्च हा कविता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो या दिवसाच्या निमित्ताने कलाविष्कार अकादमीच्यावतीने कवी संमेलनाचे आयोजन केले होते. कवी डॉ रुपेशकुमार जावळे यांच्या अध्यक्षतेखाली हे कवी संमेलन पार पडले. या कवी संमेलनामध्ये कलाविष्कार अकादमीचे अध्यक्ष युवराज नळे, जेष्ठ कवी राजेंद्र अत्रे, डॉ अरविंद हंगरगेकर, बाळ पाटील, विजय गायकवाड, अभिमन्यू इंगळे, डॉ शिवाजी गायकवाड, कृष्णा साळुंखे, अविनाश मुंडे, स्नेहलता झरकर, अंदुरे, डॉ अस्मिता बुरगुटे, डॉ कृष्णा तेरकर, पंडित कांबळे, श्याम नवले, डॉ मधुकर गुजरे, प्रभाकर बनसोडे आदी कवींनी उत्स्फूर्तपणे बहारदार कविता सादर करुन कविता दिवस साजरा केला. सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी तर आभार डॉ अरविंद हंगरगेकर यांनी मानले.

अखेर जिल्हा शेतकरी बचाव अराजकीय कृती समितीच्या लढ्याला आले यश - शिंगाडे

वर्ग २ च्या जमिनी पुन्हा वर्ग १ मध्ये येण्याचा मार्ग मोकळा

मा.श्री.प्रवीणसिंह परदेशी
मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा
धाराशिव जिल्हा अराजकी
संघर्ष कृती समिती,
धनंजय शिंगाडे

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) – गेल्या दोन वर्षांपासून जिल्हा शेतकरी बचाव अराजकीय कृती समितीच्या लढ्याला अखेर यश आले आहे. कारण वर्ग २ च्या जमिनी पुन्हा वर्ग १ मध्ये येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वर्ग १ च्या जमिनी रातोरात वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये करण्याचा निर्णय तत्कालीन जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी घेतला होता. त्या विरोधात जिल्हा शेतकरी बचाव अराजकीय कृती समितीच्यावतीने वारंवार आंदोलने केली. त्यामुळे या लढ्याला गेल्या १५ दिवसांत यश आले. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी समितीला सहकार्य केले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांनी दि.२२ मार्च रोजी दिली.

शहरातील हॉटेल पुष्पक पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी समितीचे कार्याध्यक्ष राजाभाऊ बागल, अनिल काळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना शिंगाडे म्हणाले की, तत्कालीन जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी जिल्ह्यातील सुमारे १२ हजार ५०० हजार एकर इनामी, मदत्मास, खिदमत मास सीलिंग जमिनी व महार वतन जमीन वर्ग १ मधून वर्ग २ मध्ये घेऊन शेतकरी व प्लॉट धारकांवर अन्याय केला. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. त्यामुळे शेतकरी बचाव अराजकीय कृती समितीच्यावतीने गेल्या २ वर्षांपासून आक्रोश मोर्चा, उपोषण, धरणे आंदोलन, जागरण गोंधळ अशा विविध आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालक मंत्री, खासदार, आमदार यांना निवेदने देऊन पाठपुरावा केला होता. गेल्या १५ दिवसांपूर्वी जिल्हा शेतकरी बचाव अराजकीय कृती समितीच्या शिष्टमंडळाने मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांची भेट घेऊन व्यथा मांडली. तेव्हा परदेशी यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मीना, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व इतर अधिकारी यांच्या समवेत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला. अखेर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून १ महिन्यात समितीचा अहवाल शासनाला सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी व प्लॉटधारकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे शिंगाडे, ॲड. काळे व बागल यांनी सांगितले.

केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ इंडिया आघाडीची निदर्शने

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) –दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना राजकीय सूडबुद्धीने अटक केल्याच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या वतीने शुक्रवारी (दि.२२) धाराशिव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली. ना झुकेंगे ना रुकेंगे,लडेंगे औंर जितेंगे.. अशा घोषणा देऊन भारतीय जनता पार्टी आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा निषेध करण्यात आला. आम आदमी पार्टीच्या पुढाकारातून हे आंदोलन करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत पराभव समोर दिसून येत असल्यामुळे राजकीय सूडबुद्धीने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. म्हणून मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या दडपशाही धोरणाचा निषेध इंडिया आघाडीच्या वतीने करण्यात येत असल्याचे आम आदमी पार्टीचे राहुल माकोडे यावेळी म्हणाले. यावेळी शिवसनेचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव, काँग्रेसचे शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे आदींनी भारतीय जनता पार्टीच्या दडपशाहीच्या धोरणावर कडाडून टीका केली. या आंदोलनात मुन्ना शेख, प्रशांत पाटील, तानाजी पिंपळे, राजपाल देशमुख, संजय दणाने, श्रीकांत भुतेकर, मुख्तार शेख, शहाजी पवार, अंकुश चौधरी, बिलाल रझवी, अभिजीत देवकुळे, मधुकर शेळके, सुरेश शेळके, उस्मानभाई तांबोळी, सागर साळूंके, दत्ता दळवी, सुरेखाताई यादव, श्री. बोबडे, सुनील बडूरकर, बंडू आदरकर, संजय पवार यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्यंकटेश महाजन महाविद्यालयास करिअर कट्टा पुरस्कार प्रदान

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) – येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयास करिअर कट्टा स्पर्धेतील तीन पुरस्कार मिळाले आहेत.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा महाविद्यालयीन स्पर्धा २०२३–२४ मध्ये धाराशिव येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयाला ३ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील देवगिरी महाविद्यालयामध्ये झालेल्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी करिअर कट्टा संस्थापक डॉ. यशवंत शितोळे, न्यायाधीश वैशाली हंगरगेकर, व्हाईस थेरपिस्ट डॉ. सोनाली लोहार व देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजणकर आदी उपस्थित होते. या पुरस्कारामध्ये करिअर कट्टा उत्कृष्ट तालुका समन्वयक प्रथम क्रमांक, उत्कृष्ट प्राचार्य द्वितीय क्रमांक आणि उत्कृष्ट महाविद्यालय चतुर्थ क्रमांक हे पुरस्कार महाविद्यालयाला मिळाले आहेत. महाविद्यालयाच्यावतीने प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ व प्रा. अभय शिंदे यांनी हे पुरस्कार स्विकारले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेच्या मार्गदर्शिका रेखाताई महाजन, संस्था सचिव ऑड. मिलिंद पाटील, संस्था सदस्य शेषाद्री डांगे, कमलाकर पाटील, डॉ.अभय शहापूरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी अभिनंदन केले आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय करिअर कट्टा ६ पुरस्काराने सन्मानित

मुरुम दि.२२ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आयोजित करीअर कट्टा अंतर्गत २०२३–२४ या वर्षात राबवलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांबद्दल भारत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सहा पुरस्काराचे वितरण श्री छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा न्यायाधीश वैशाली हांगर्गेकर, माजी प्र–कुलगुरु डॉ अशोक तेजनकर, डॉ सोनाली लोहार, यशवंत शितोळे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी.एच. जाधव, उपप्राचार्य व जिल्हा समन्वयक डॉ संजय अस्वले महाविद्यालय समन्वयक डॉ एस.पी. पसरकले, डॉ ए.के. कटके यांनी स्विकारले. श्री छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयात या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक तेजनकर यांनी अध्यक्षीय भाषणात करीअर कट्टाचे उपक्रम नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून आहेत. त्याचा लाभ सर्व महाविद्यालयांनी घ्यावा असे आवाहन केले. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास उत्कृष्ट विभागीयस्तरीय महाविद्यालय., उत्कृष्ट महाविद्यालय धाराशिव जिल्हा, उत्कृष्ट प्राचार्य म्हणून डॉ जी एच जाधव, उत्कृष्ट राज्यस्तरीय जिल्हा समन्वयक म्हणून डॉ संजय अस्वले, उत्कृष्ट महाविद्यालय समन्वयक म्हणून डॉ एस.पी. पसरकले आणि डॉ ए.के. कटके तसेच महाविद्यालय उत्कृष्ट विद्यार्थी संसद म्हणून मुख्यमंत्री प्रसाद ममाळे, विजय मुळे, वैष्णवी तीगलपले निरंजन कटके सौरभ पाटील अथर्व चाकूरकर आणि सर्व संसद सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र समिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष डॉ यशवंत शितोळे यांनी तर सूत्रसंचालन विभागीय समन्वयक डॉ राजेश लहाने यांनी तसेच आभार विभागीय समन्वयक डॉ खंदारे यांनी मानले. या यशाबद्दल भारत शिक्षण संस्था अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे, सरचिटणीस जनार्धन साठे, सचिव पद्माकर हराळकर, सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ पी ए पिटले, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे व प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा उपाध्यक्षपदी शिवाजी कोकरे यांची नियुक्ती

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) –राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन तसेच जिल्हयातील नेतृत्व प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यतत्पर जिल्हाध्यक्ष मा.महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय धाराशिव येथे जिल्हा उपाध्यक्ष पदाची नियुक्ती करण्यात आली.

कार्ला ता.तुळजापूर येथील शिवाजी हरिदास कोकरे यांची धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष पदी प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार आणि जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती देण्यात आली. नव नियुक्त जिल्हा उपाध्यक्ष यांचा प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार व जिल्हाध्यक्ष् महेंद्र धुरगुडे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार व जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्यासोबत प्रदेश कार्यकारणी सदस्य किशोर साठे, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, महीला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण,माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप,विद्यार्थी जिल्हा कार्याध्यक्ष प्रतीक माने,सा.न्याय. जिल्हा सरचिणीस राजाभाऊ जानराव, धाराशिव महिला तालुका उपाध्यक्ष उषा लगाडे, धाराशिव शहर महीला शहराध्यक्षा सुलोचना जाधव,अंबेजवळगा जि.प गट प्रमुख सुरेश राठोड, खंडेराव किशवे, दत्तू देवकर, बालाजी देवकर संतोष जाधव, अमोल देवकर, रामा देवकर, तुकाराम देवकर, नागनाथ शेंडगे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी उपस्थित होते.

मिलिंद कांबळे हे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

नळदुर्ग दि.२२ (प्रतिनिधी) – येथील मिलिंद मल्हारी कांबळे हे आरोग्य विभागात अनेक वर्षापासून उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. ते चंद्रपूर जिल्ह्यात पद्धतीने सर्वेक्षण करून रुग्णांना सेवा देत आहेत. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शासन दरबारी त्यांच्याबद्दलची व त्यांची काम करण्याची पद्धत वेगळी दिसून आल्याने त्यांनी खूप वेळा रुग्णांना स्वतः त्यांच्या घरी जाऊन उत्कृष्ठ सेवा दिली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून नागपूर येथील परिमंडळ ए डी एच एच मार्फत मिलिंद मल्हारी कांबळे यांना पुणे येथील यशदा येथे सहसंचालक आरोग्य सेवा पुणे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. या पुरस्कारामुळे दीपक कांबळे डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक मुख्य प्रवर्तक मारुती खारवे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, विश्वास राणे, वैभव कांबळे, योगेश सुरवसे, अश्विन कांबळे आदींनी अभिनंदन केले आहे.

छावा पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसह गोरगरीबांच्या अडचणी सोडविण्यासाठी काम करावे - काळे

धाराशिव दि.२२ (प्रतिनिधी) – अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अण्णासाहेब जावळे पाटील यांनी शेतकरी, विद्यार्थी आणि गोरगरीबांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम केले. मराठा आरक्षणासाठी रान पेटवून शेवटच्या श्वासापर्यंत ते लढले. यापुढे नानासाहेब जावळे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली छावा पदाधिकार्यांनी शेतकर्यांना हमीभाव, विद्यार्थी तसेच गोरगरीबांच्या अडचणी सोडविण्यासाठी छावा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने काम करावे, असे आवाहन अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे यांनी केले.

धाराशिव शहरातील समर्थ हॉलमध्ये अखिल भारतीय छावा संघटनेची जिल्हा आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, जालना जिल्हाध्यक्ष राधेश्याम पोवळ, सोशल मीडिया जिल्हा उपध्यक्ष नानासाहेब गुंड, महिला तालुकाध्यक्ष आशा सुरवसे, भूम तालुकाध्यक्ष कल्याण हुंबे , जिल्हा संघटक अमोल गोरे, सचिव ज्योतीराम काळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना काळे म्हणाले की, जो सोबत येईल त्याला सोबत घेऊन, जो सोडून जाईल त्याला सोडून देऊन आणि जो आडवा येईल त्याला आडवा करुन पुढे जायचे असे अशा विचारांनी अण्णासाहेब जावळे पाटील यांनी संघटना बळकट केली. यापुढील काळात याच विचाराने संघटन अधिक मजबूत करण्याची जबाबदार आपल्यावर आहे. सर्व जातीधर्माला सोबत घेऊन कार्यकर्त्यांनी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी धाराशिव शहराध्यक्षपदी प्रशांत पवार, शहर उपाध्यक्ष अमोल मोरे, धाराशिव युवक अध्यक्ष बालाजी होबळे, धाराशिव तालुका संघटक बालाजी पवार, विद्यार्थी युवक तालुका अध्यक्ष विजयकुमार दत्तात्रय मुळे, युवक अध्यक्ष (ग्रामीण) अजय लोंढे, युवक उपाध्यक्ष विक्रम कदम, तालुका संघटक (ग्रामीण) सचिन जमादार यांची तर भूम विद्यार्थी तालुकाध्यक्षपदी अजित नवनाथ हुंबे, वाहतूक तालुकाध्यक्ष संदीप भगत यांची तर तालुका संघटकपदी मल्हारी नवनाथ सावंत यांची निवड करण्यात आली. या बैठकीस छावा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आलमला फार्मसी कॉलेजमध्ये सुसंवादाचे दहा मंत्रावर मार्गदर्शन -दिपाली केळकर

महिला सशक्तीकरण विभागा अंतर्गत महिला दिनानिमित्याने संवाद व मार्गदर्शन
सुसंवादाचे दहा मंत्र
प्रमुख पाहुणे व
सौ. दिपाली
सुप्रसिद्ध दूरदर्शन वृत्तनिवे

औसा: युवकांनी तेजस्वीता, तत्परता व तपस्वीता या तीन गुणांचा अंगीकार केला पाहिजे आणि न्यूनगंड, नकारात्मकता व निराशा या तीन गोष्टी युवकांमध्ये नसल्या पाहिजेत. पैसा, मोबाईल व आरोग्य या मानवाच्या मुलभूत गरजा सोबतच संवाद ही एक महत्वाची मुलभूत गरज आहे तसेच युवकांनी चांगल्या सुसंगत मार्गाचा अवलंब करावा चुकीच्या मार्गावर जाऊ नये सत्य सौम्य पद्धतीने सांगावे यासाठी कुशलता व चतुरता लागते. एखादया व्यक्तीचे गुण हे सर्वासमोर सांगावे आणि दोष मात्र त्या एकटया व्यक्तीला सौम्य पध्दतीने सांगावे. आपल्या वाणीचे काही दोष आहेत त्यामध्ये एखादयाचा दोष करणे, टिका करणे, आराडा ओरडा करणे, असत्य बोलणे , एखादयाच्या वर्मावर बोट ठेवणे व उगाचाच एखादयाचा विरोध करणे इत्यादी असल्याचे वक्तव्य सुप्रसिध्द दुरदर्शन वृत्तनिवेदिका व व्याख्याता दिपाली केळकर यांनी शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी महाविद्यालयातील महिला सशक्तीकरण विभाग अंतर्गत महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संवाद व मागदर्शन कार्यक्रमात केले. दैनंदीन आयुष्यातील संवादाचे महत्व, बोलण्याचे प्रकार, संवाद कलेचे विविध पैलू, सुत्रसंचालन, भाषण, आभार इत्यादी विषयावर संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे सचिव बसरावज धाराशिवे यांनी संस्थेच्या प्रगतीचा चढता आलेख मांडताना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अत्याधुनिक शिक्षण, तांत्रिक स्पर्धा, क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थी रीसर्च, क्रिडा अशा विविध क्षेत्रात यशस्वी होत असून विद्यापीठा अंतर्गत होणाऐया परीक्षेत ही महाविद्यालयातील विद्यार्थी हे विद्यापीठातून प्रथम येत असल्याचे नमुद केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनास संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, सचिव बसवराज धाराशिवे, प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे, शिवकांता धाराशिवे, दिपमाला धाराशिवे, मेघा धाराशिवे, डॉ. अनुराधा धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, संचालक जयशंकर हुरदळे, माजी सरपंच कैलास निलंगेकर, अमर हजारे, प्रा. दिनेश गुजराथी, डॉ समीर शफी, डॉ. सुरज मालपाणी, डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. अजय फुगटे, विकास मुगळे, कार्यक्रमाच्या समन्वयीका कापसे विद्या उपस्थित होते.

फार्मसी कौंसील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी फार्मसी इन्सपेक्टर म्हणुन मान्यता दिलेले प्रा. दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी व डॉ. सुरज मालपाणी यांचा सत्कार दिपाली केळकर व संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांच्या शुभस्ते करण्यात आले तसेच पुढे एम. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्याथ्र्यांना उपयुक्त ठरेल असे पुस्तक कम्प्युटर अ‍ॅडेड ड्रग डिजाईन डॉ. सुरज मालपाणी व प्रा. मयुरी चंद्रवंशी निर्मित पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्याच्या व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरी चंद्रवंशी यांनी केले तर आभार डॉ. समीर शफी यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

Z.P.P.S.KANEGAON
TQ: SHIRUR ANANTPAL DIST: LATUR
Enjoy the work you

वाढदिवसाच्या निमित्ताने थंड पाण्याचे बॉटल व शैक्षणिक साहित्याचे वाटप

नातवाच्या वाढदिवसानिमित्त आजी - आजोबांचा अनोखा उपक्रम

प्रशांत तांबोळकर

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी- तालुक्यातील कानेगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका राधाबाई येडले व त्यांचे पतीमाजी सरपंच महेंद्र बंडले यांचे चिरंजीव नितीश बंडले व स्नुषा प्रतीक्षा हे लंडनमध्ये मोठ्या पदावर नोकरी करतात. दिनांक १७ मार्च रोजी त्यांचा मुलगा रिदान याचा पहिला वाढदिवस होता.

वाढदिवसाचा खर्च नाहकपणे करून उधळपट्टी करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात उपयोगात आणून त्यांच्या गरजा पूर्ण केल्या तर विद्यार्थ्यांची शालेय गोडी वाढून त्यांच्या गरजा पूर्ण होवू शकतात. हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून बंडले दाम्पत्यांनी आपल्या नातवाच्या वाढदिवसानिमित्त कानेगाव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बिस्कीट, लेखन व शालेय साहित्याचे वाटप केले. तसेच आता उन्हाळ्याची चाहूल लागल्यामुळे थंड पाण्याच्या बाटल्यांचेही मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक सुरेश बिरादार, सुशीलकुमार पांचाळ, गंगाधर बोररूळकर, चंद्रसेन ढगे, प्रशांत जाधव, शरद येडले, नारायण सोलंकर, राधाबाई सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती.

श्री राधाकृष्ण मंदिर विकासासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर

आ. कराड यांचे गातेगाव येथील ग्रामस्थांनी मानले आभार

लातूर दि.१९ - लातूर तालुक्यातील मौजे गातेगाव येथील श्री राधाकृष्ण मंदिर विकास कामासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतून तब्बल २ कोटी आणि पर्यटन विकास योजनेतून २० लाख यासह विविध योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचे गातेगाव येथील ग्रामस्थांनी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे गातेगाव येथे परमपूज्य विद्यानंदजी सागर महाराज यांच्या आध्यात्मिक कार्यातून श्री राधाकृष्ण आध्यात्म आश्रम कार्यरत आहे. या राधाकृष्ण मंदिर परिसराचा विकास व्हावा सोई सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब यांच्याकडे भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे गातेगाव येथील श्री राधाकृष्ण मंदिर परिसरात भक्तनिवास बांधकाम करणे, सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे, मंदिर संरक्षण भिंत बांधकाम करणे, पाण्याची टाकी व पाईपलाईन आदी विकास कामाकरिता तब्बल २ कोटी रुपयाचा निधी गेल्या १३ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानूसार राज्याच्या ग्रामविकास विभागाअंतर्गत ब वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राच्या विकास योजनेतून मंजूर झाला आहे. त्याचबरोबर जिल्हा पर्यटन विकास योजने अंतर्गत मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक कामासाठी २० लाखांसह गातेगाव येथील गावांतर्गत विविध कामांना आमदार रमेशअप्पा कराड यांनी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला.

गातेगाव येथील विविध विकास कामासाठी गावच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढा मोठा निधी मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा जाहीर सत्कार करून ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी व्हाईस चेअरमन नाथसिंह देशमुख, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, गातेगाव येथील सरपंच नागनाथ बनसोडे, उपसरपंच ज्ञानेश्वर जुगल, ग्रामपंचायतचे सदस्य अमित जावळे सोसायटीचे सदस्य विनायक धावारे, शिवरुद्र चौंडे, श्याम माळी, बालाजी गवळी, सुरेश सूर्यवंशी यांच्यासह गातेगाव आणि परिसरातील नागरिक, भाजपा कार्यकर्ते, भाविक भक्त उपस्थित होते.

डॉ. कल्याण बरमदे यांची अ. भा.लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड

Fortified with 2000 IU Vit D3
Active form of Vitamins

लातूर / प्रतिनिधी:- येथील ख्यातनाम स्त्री रोग तज्ज्ञ तथा वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांची वाराणसी येथे नुकत्याच पार पडलेल्या अ. भा.लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटनेच्या वार्षिक परिषदेत संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

अखिल भारतीय लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटनेच्या वाराणसी येथे पार पडलेल्या वार्षिक परिषदेस देशभरातील सहाशेहून अधिक तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते. यावेळी संघटनेची वर्ष २०२४-२५ ची कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. अतुल गणात्रा, उपाध्यक्ष डॉ. कल्याण बरमदे यांची तर सचिव म्हणून डॉ. सुधा टंडन यांची निवड करण्यात आली. अ. भा.लॅप्रोस्कोपिक स्त्री रोग संघटना ही भारतातील लॅप्रोस्कोपिक म्हणजे बिन टाक्याने होणाऱ्या शस्त्रक्रिया म्हणजे गर्भ पिशवीचे आजार, गर्भ पिशवी गाठ काढणे, गर्भ वाहक नलिकेचे आजार, गर्भ वाहक अंडकोश आजाराच्या शस्त्रक्रियेविषयी मार्गदर्शन करण्याचे काम करते. देशपातळीवर स्त्री विषयक आरोग्य क्षेत्रात काम करणारी ही एक अग्रगण्य संघटना आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अ. भा. स्त्री रोग संघटना फॉगसी चे अध्यक्ष डॉ. जयदीप टँक, भारतीय टेस्ट ट्यूब बेबी चे अध्यक्ष डॉ. अमित पत्की, माजी अध्यक्ष डॉ. पंडित पळसकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या परिषदेत सायंटिफिक लेक्चर, परिचर्चा, संवाद व लाईव्ह डेमोनस्ट्रेशन करण्यात आले. यामध्ये गर्भ पिशवीचे आजार यावरील चर्चासत्रात डॉ. कल्याण बरमदे यांनी मार्गदर्शन केले. तसेच लाईव्ह सर्जरीमध्ये त्यांनी डेमोनस्ट्रेशनही करून दाखवले. डॉ. कल्याण बरमदे यांच्या या निवडीबद्दल लातूर आयएमए चे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, सचिव डॉ. आशिष चेपूरे, आयएमए सदस्य डॉ. अजय जाधव, डॉ. संजय पौळ, डॉ. रमेश भराटे, डॉ. अजय पुनपाळे, स्त्री रोग संघटनेच्या डॉ. मेघना गुगळे, डॉ. अनिल वलसे, डॉ. संदीपान साबदे, डॉ. वर्धमान उदगीरकर, डॉ. चंद्रशेखर आष्टेकर, डॉ. सुधाकर सुडे, डॉ. प्रताप पन्हाळे आदीनी त्यांचे कौतुक केले आहे.

वै. धुंडा महाराज महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान

देगलूर (प्रतिनिधी) - निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांना मतदारापर्यंत पोहचून मतदानाबाबत जनजागृती घडवून आणण्याच्या भूमिकेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. भिमराव माळगे यांनी प्रास्ताविकातून, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी विद्यार्थ्यांनी जनजागृतीची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. अभिमन्यू पाटील यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मतदान करण्याबाबत शपथ दिली. प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतातून मतदानाचे महत्त्व प्रतिपादित केले. योग्य लोकप्रतिनिधी निवडून येण्याच्या दृष्टीने प्रत्येकाने मतदानाचा अधिकार बजावावा असे त्यांनी प्रतिपादित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश जांभळीकर यांनी केले; तर आभार प्रदर्शन प्रा. दिलीप पस्तापुरे यांनी केले. या अभियानात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वरा पांढरे गुरूकुल प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात सर्वप्रथम

लातूर / प्रतिनिधी- जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वरा पांढरे हिने गुरूकुल प्रज्ञाशोध परीक्षेत १०० पैकी १०० गुण घेऊन महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे तर अवनी सुरवसे व प्रथमेश मोरे हे दोन्ही विद्यार्थी ९८ गुण घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांच्या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

त्यांच्या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेच्या सचिव प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, जेएसपीएम संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, समन्वयक संचालक निळकंठराव पवार, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक विनोद जाधव, फायणांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक तुकाराम येलाले, अ‍ॅकॅडमीक कॉऑर्डिनेटर वर्षा वेधे, स्पर्धा परीक्षा वर्गाच्या शिक्षिका वर्षा लोंढे, अश्विनी कांबळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

जैवतंत्रज्ञान विभागाच्या आयआयटी जाम व गेट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन : लड्डा

DSCL(Sr.)
STAFF ROOM
(NON TEACHING)
(MICROBIOLOGY)
INSTRUMENTATION ROOM

लातूर - विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या विविध उपक्रमाचे फलित म्हणजे त्यांचे विद्यार्थी अनेक स्पर्धामध्ये यशस्वी ठरत आहेत, आयआयटी जाम व गेट परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी त्याचे उदाहरण आहे असे डॉ. लड्डा यावेळी म्हणाले. महाविद्यालय विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजना व त्यांची माहिती पुरविण्यासाठी प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्राध्यापकांच्या सहकार्याने त्याची माहिती घ्यावी. देशातील अनेक नामांकित संस्था संशोधन करण्यासाठी सहकार्य करतात त्याचा शोध घ्यावा असे ते म्हणाले.

दयानंदविज्ञानमहाविद्यालयात दि. २१ मार्च २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक वॉल्टर गिल्बर्ट यांची ९२ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. वैज्ञानिकांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्यास अभिवादन करण्याचा हा उपक्रम दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे राबवला जातो. दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, माजी प्राचार्य लड्डा जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची सुरुवात वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली. वैज्ञानिक वॉल्टर गिल्बर्ट यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द प्रा. स्वरूप गावकरे यांनी सांगितली. आयआयटी जाम उत्तीर्ण बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाचे विद्यार्थी संतोषी भालेराव, चिन्मय कांबळे व प्रकाश गवळी तसेच गेट परीक्षा उत्तीर्ण संतोषी भालेराव यांचे यावेळी पाहुण्यांच्या हस्ते पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.

वॉल्टर गिल्बर्ट हे अमेरिकन बायोकेमिस्ट, भौतिकशास्त्रज्ञ, आण्विक जीवशास्त्र प्रणेते आणि नोबेल पारितोषिक विजेते आहेत. गिल्बर्ट हे मानवी जीनोमच्या अनुक्रमाचे सुरुवातीचे समर्थक होते. सांता फे न्यू मेक्सिको येथे मार्च १९८६ च्या सभेत त्यांनी एकूण मानवी अनुक्रम मानवी अनुवंशशास्त्राची ग्रेल आहे अशी घोषणा केली. १९८७ मध्ये, त्यांनी जीनोमची क्रमवारी लावण्यासाठी आणि माहितीचा प्रवेश विकण्यासाठी जीनोम कॉर्पोरेशन नावाची कंपनी सुरू करण्याचा प्रस्ताव दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे सदस्य प्रा. स्वरूप गावकरे व प्रा. श्रीनिवास कुलकर्णी आणि विद्यार्थी मंचचे पदाधिकारी विद्यार्थी तसेच विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

अंगाची लाही लाही

कुलर एसी ची मागणी वाढली

प्रशांत तांबोळकर

शिरूरआनंतपाळ : उन्हाचे तापमान दिवसेदिवस वाढत चालल्याने अंगाची लाही लाही होत आहे. त्यामुळे प्रत्येक जन आपले घर थंड राहण्यासाठी बाजारातुन नामंकित कंपनीचे कुलर, एसी व थंड गारवा देणारे इलेक्ट्रीकल साहित्याची खरेदी करण्यासाठी गर्दी होत आहे.

यावर्षी मार्च महिण्यापासुनच कडक उन्हाची सुरवात झाली असुन सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत कडक ऊन्ह लागत असुन जेष्ट नागरिकासह बालगोपाळाची अंगाची लाही लाही होत आहे. त्यामुळे विक्रेत्यांनी नामकिंत कपंन्याचे कुलर, एसी व थंड गारवा देणारे फॅन आपल्या ग्राहकांची गरज लक्षात घेवून दुकाणात विक्रीसाठी आणले आहेत. कच्चा माल महागल्याने कुलिंग उत्पादनाच्या खर्चात वाढ झाली आहे. रेफ्रीजरेटर आणि एसी च्या किमतीत पाच ते दहा टक्के वाढ झाली आहे. माञ वाढत्या उकाड्यामुळे हैरान झालेल्या नागरिकांनी नामकिंत कपंनीचे कुलर व एसी घेण्याला पसंती दिली आहे. शहरी भागासह ग्रामिण भागात दुपारच्यावेळी रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. ग्रामिण भागातील जेष्ट नागरिक दुपारचे तापमान वाढत असल्याने उन्हापासुन बचाव करण्यासाठी थंड गारवा देणार्या झाडाखाली आश्रय घेत आहेत.

कुलरच्या विक्रीत वाढ

मार्च महिण्यात सकाळी नऊ वाजल्यापासुनच सुर्यदेव आग ओकत आहे. त्यामुळे जेष्ट नागरिकासह घरातील बालगोपाळाची अंगाची लाही लाही होत आहे. त्यामुळे गरमीपासुन शरिराचे संतुलन व्यवस्थित ठेवण्यासाठी शहरी भागाबरोबरच ग्रामिण भागात कुलर,फ्रीज व एसीची मागणी वाढली आहे. ग्राहक आपआपल्या आर्थिक क्षमतेनूसार थंड गारवा देणार्या इलेक्ट्रीकल वस्तुची खरेदी करत असतात. माञ गेल्या पंधरा दिवसापासुन कुलरची जास्त विक्री होत असल्याचे येरोळ येथील गुरुकृपा फर्नीचेअरचे व्यापारी सन्मुखप्पा स्वामी यांनी सांगितले.

संपादकीय

गरज आक्रमकतेची

काँग्रेस व अन्य पक्षांतून भाजपत नेते जात आहेत असे नाही तर भाजपमधूनही काँग्रेसमध्ये नेते येत आहेत. यास जोरदार प्रसिद्धी देणे व प्रचार अधिक आक्रमकपणे करणे यावर काँग्रेसने भर दिला पाहिजे.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. महाराष्ट्रातील रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर व चंद्रपूर या पाच मतदार संघात दि.१९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत सुमारे ५० उमेदवार निश्चित झाल्याची बातमी आहे. त्यात महाराष्ट्रातील सात उमेदवार असल्याचे कळते'. राज्यातील १४ उमेदवार पक्षाने निश्चित केल्याचे अन्य एका बातमीत म्हटले आहे. राज्यात काँग्रेस एकटा नाही तर महाविकास आघाडी'चा घटक आहे. या आघाडीची एक बैठक राष्ट्रवादी पक्षाच्या शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल आयोजित केली होती. त्यात काही मतदार संघ व उमेदवार यांच्यावर चर्चा होणे अपेक्षित होते. जाहीर झालेल्या वृत्तांमध्येही एकाच मतदार संघासाठी वेगवेगळी नावे दिली गेली आहेत. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने राज्यात चंद्रपूर ही एकमेव जागा जिंकली होती. तेथून सुरेश तथा बाळू धानोरकर यांनी विजय मिळवला होता. त्यांचे गेल्या वर्षी अचानक निधन झाले. त्या मतदार संघातून त्यांच्या पत्नी प्रतिभा यांना उमेदवारी मिळणार असल्याचे एका बातमीत म्हटले आहे, तर दुसऱ्या वृत्तपत्राने या मतदार संघासाठी विजय वडेट्टीवार यांचे नाव निश्चित झाल्याचे म्हटले आहे. हा संभ्रम पक्षासाठी योग्य नाही.

आर्थिक कोंडी

माजी केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर मतदार संघात काँग्रेसचे अनेक वेळा प्रतिनिधित्व केले आहे. आता तेथे त्यांच्या कन्या प्रणिती यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. सुशील कुमार यांचे नाव व त्यांचे कार्य यांचा फायदा प्रणिती यांना होईल. काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांना भंडारा-गोंदियामधून उमेदवारी मिळणे जवळपास नक्की आहे. २०१४ मध्ये त्यांनी याच मतदारसंघातून विजय मिळवला होता; पण तेव्हा ते भारतीय जनता पक्षातर्फे लढले होते. इतर मागास वर्गातील ते एक प्रभावी नेते आहेत. ही जागा पुन्हा जिंकण्याचे आव्हान पटोले यांच्या समोर आहे. काँग्रेसचे नागपूर शहर अध्यक्ष विकास ठाकरे यांना या मतदार संघातून उमेदवारी दिली जाणार आहे. त्यांच्या समोर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आव्हान असणार आहे. गडचिरोली-चिमूरमधून पक्षाने नामदेव उसेंदी यांना पक्षाने संधी दिली आहे. महाविकास आघाडीतील अन्य घटक पक्षांबरोबर चर्चा झाल्यानंतर रामटेकचा उमेदवार ठरेल असे दिसते. ही जागा गेल्या वेळी एकत्रित शिवसेनेने जिंकली होती. आता शिवसेनेत फूट पडल्याने या जागेवर चुरस निर्माण झाली आहे. पुणे लोकसभा मतदार संघावर समाजवादी विचारांचे पक्ष व नंतर काँग्रेसचे अनेक वर्षे वर्चस्व होते. गेल्या निवडणुकीत भाजपचे गिरीश बापट यांनी तेथे विजय मिळवला. आता पुण्यातून काँग्रेसने रविंद्र धंगेकर यांचे नाव निश्चित केल्याचे वृत्त लक्षवेधी आहे. विधानसभेच्या कसबा मतदार संघात झालेल्या पोटनिवडणुकीत धंगेकर यांनी भाजपचा पराभव केला होता. त्यामुळे त्यांना लोकप्रियता मिळाली; मात्र लोकसभा निवडणुकीचे आव्हान अवघड आहे हेही मान्य केले पाहिजे. इंडिया आघाडी व राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रांमुळे पक्षात उत्साह आहे; पण पक्षाला साधन सामग्रीची चणचण जाणवत आहे. पक्षाच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी हाच मुद्दा नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत मांडला. काँग्रेसची खाती गोठवणे, प्राप्तिकर वसुलीची नोटीस देणे अशा कारवाईतून मोदी सरकार काँग्रेसला आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनवू पाहात आहे असे त्या म्हणाल्या आहेत. सत्तेविरुद्ध लढताना अशा अडचणी अपेक्षितच आहेत. त्यावर मात करण्यासाठी काँग्रेसने इंडिया आघाडीतील मित्रपक्षांशी अधिक समन्वय ठेवणे आवश्यक आहे. त्यांच्यामुळे जागा वाटप थांबले आहे असे चित्र निर्माण होणे किंवा उमेदवारांची अधिकृत घोषणा न होणे यामुळे संभ्रम वाढेल. राहुल यांच्या यात्रा व त्यांना मित्रपक्षांनी दिलेला पाठिंबा यामुळे देशात व राज्यात सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. त्याचा फायदा काँग्रेसने घेतला पाहिजे. त्यासाठी अधिक आक्रमक पवित्रा स्वीकारला पाहिजे.

यश गाठायचे असेल तर स्वयंशिस्त हवीच

ज्याप्रमाणे आग आपल्या उष्णतेच्या साहाय्याने सोन्याला उजळून टाकते, अगदी त्याचप्रमाणे स्वयंशिस्त कोणत्याही तरूणाचे व्यक्तिमत्त्व चमकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्वयंशिस्त बाळगणाऱ्या तरूणाची पावलं नेहमी यशाकडे वेगाने सरकत असतात; पण ही स्वयंशिस्त म्हणजे नेमके काय तर ही स्वयंशिस्त म्हणजे आपली पावलं योग्य दिशेकडे वळविणे. स्वयंशिस्तीमुळे तुम्ही कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहू शकता. डगमगून न जाता धैर्याने, संकटाचा सामना करू शकता. मात्र स्वयंशिस्त अंगी बाणण्यासाठी गरज असते ती आळस आणि सुखाचा त्याग करण्याची! स्वयंशिस्त लावून घेतल्याने कोणी लहान होत नाही. एकदा का आपण स्वत:ला शिस्त लावून घेतलीत की, तुमच्या व्यक्तिमत्त्वात आणि जीवनात बदल झालाच म्हणून समजा. यामुळे तुम्हाला नैतिक छळ आणि निरोगी आरोग्य लाभते, ते वेगळेच.

सुविचार

अविचाराने कोणतेही काम करु नये कारण ते अनेक आपत्तींना जन्म देतो.

– भारवि

संस्कृत सुभाषित

अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः कामातुराणां न भयं न लज्जा । चिन्तातुराणां न सुखं न निद्रा क्षुधातुराणां न बलं न तेजः ।।

अर्थ – द्रव्यासाठी आतुर झालेला माणूस गुरू किंवा भावाला जाणत नाही, कामवासनेने उद्दीपित झालेल्या माणसाला भीती किंवा लज्जाही नसते. चिंतातुराला सुख नसते किंवा निद्राही नसते. भुकेने ग्रासलेल्या माणसाला बल किंवा तेज नसते.


मी एवढे घोटाळे करूनही पकडला गेलो नाही, अन तू केवळ कॉपी करताना पकडला गेलास... नालायक!!

ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.

– संपादक **यशवंत** लातूर

चार्लस गुडइयर ५१



जगाच्या इतिहासात 'रबरटायर' मध्ये क्रांती करणाऱ्या चार्लस गुडइयर याचा जन्म अमेरिकेतील न्यूहॅव्हन शहरामध्ये इ.स. १८०० च्या सुमारास झाला. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे वडिलांच्या हार्डवेअरच्या व्यवसायात तो मदत करू लागला. त्या व्यवसायात काही जम बसेना म्हणून त्याने न्यूयॉर्कमध्ये येऊन रबराच्या कारखान्यात नोकरी धरली. रबराचे गुणधर्म कसे सुधारतील याचाच सतत विचार डोक्यात असल्याने रात्रंदिवस त्याचे रबरावरचे प्रयोग चालू असत.

त्याकाळी वापरात असणाऱ्या रबरी टोप्या, रबरी पिशव्या, रबरी कोट इत्यादी वस्तू थंडीच्या महिन्यांमध्ये टणक, लाकडासारख्या असत; परंतु उन्हाळ्याच्या दिवसात त्यातील चिकटपणा वाढे व त्या वस्तू फेकून द्यायला लागत. कुजल्यामुळे त्यांना घाण वास येई. अशारीतीने दरवर्षी रबराचा बराच माल नष्ट होऊन खूप नुकसान होई. यासाठी काय करावे, अशा विचाराने सर्वत्र प्रयोग सुरू होते. चार्लस कारखान्यात व घरीदारीही प्रयोग करण्यात मग्न असे. त्याचे काही मित्र त्याला 'रबरवेडा' म्हणून चिडवायचे.

एकदा चार्लस व त्याची पत्नी क्लौरसा यांचे या रबर प्रयोगांवरून खूप भांडण झाले. विविध रसायनांच्या वासांनी जीव नकोसा व्हायचा. प्रयोगांपायी अमर्याद कष्ट आणि आर्थिक झीज सोसावी लागायची. कर्जबाजारीमुळे घरची व्यवस्था कोलमडली होती. त्यामुळे चिडून क्लॅरिसाने त्याच्या हातातला रबरी मिश्रणाचा गोळा शेकोटीत फेकून दिला. तो काढत असतानाच स्टोव्हला धक्का लागून सर्व मिश्रण सांडून गेले. भांडण मिटले; परंतु दुसऱ्या दिवशी चार्लसला सामान गोळा करताना आश्चर्याचा धक्काच बसला. भांडणात सांडलेल्या मिश्रणापासून टणक, लवचिक व कोणत्याही वातावरणात व हवामानात टिकाऊ ठरेल असे रबर तयार झाले होते.

उहरीश्रशी त्रेब्रूशरी

अशारीतीने वाईटातून चांगली गोष्ट झाली व टणक रबराचा शोध लागला. चार्लस्ने वर्षानुर्षे घेतलेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक ताणाचे सार्थक झाले होते. रबराचा लवचिकपणा टिकवून टणकपणा निर्माण करणारी ही प्रक्रिया असल्यामुळे तिला 'व्हल्कनायझेशन' असे नाव देण्यात येऊन त्या रबराला व्हल्कनाईझ्ड रबर संबोधण्यात येऊ लागले. थोड्याच दिवसांनी चार्लसने त्या प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सर्व रासायनिक पदार्थांचे प्रमाण, अवस्था, तापमान, बाष्पमय वातावरण इत्यादी गोष्टी निश्चित केल्या व पेटंट मिळवले.

या सर्व खटाटोपासाठी ठिकठिकाणच्या सावकारांच्या विनवण्या करून चार्लस्ने पैसा उभा केला व तो कर्जबाजारी शेवटपर्यंत राहिला. हितशत्रूंनी खूप अडथळे आणले. असामान्य प्रयोग करणाऱ्या चार्लस्चा इ.स. १८९८ मध्ये या जागतिक महत्त्वाच्या पेटंटवर पूर्णपणे हक्क प्रस्थापित झाला व नवीन पद्धतीने तयार झालेले मोटारीचे व अन्य वाहनांचे टायर्स 'गुडइयर टायर्स' नावाने फ्रैंक सिबरलिंग याने प्रसिद्ध केले. काही रबरी वस्तूंचे प्रदर्शन सुद्धा मोठ्या शहरात भरवले. पण शेवटी कर्जबाजारी अवस्थेतच १८६० मध्ये त्याचा दुर्दैवी शेवट झाला.

सुर्याची सावली

राज्यशासन पुरस्कारप्राप्त कादंबरी

ओघवतं आणि सुसाट...हाताशी वेगळ न होणारं खुप कमी लेखन असत, सुर्याची सावली त्यातीलच एक.

लेखक नितिन थोरातची ही पहिली कादंबरी माझ्या हातात काल प्रवासात पडली आणि अवघ्या एक तास नव्वद मिनिटमध्ये मी ती संपवली.

पुस्तकाची सुरूवातच साजबा, दिनी आणि सुभण्या या छोट्या कुटूंबाने होते ज्यांना पोटाची खळगी भरण्यासाठी गाव पालथी घालावी लागत असत. एका वाटीभर दुधासाठी बाप मुलासाठी,काय करू शकतो हे पहिल्याच काही पानात लक्षात येते. वाचतांना मन विषण्ण होते. आणि बाप नावाच्या अस्तित्वा समोर नतमस्तक होते!

प्रामाणिक माणसाच्या जीवनाचा अजातशत्रू म्हणजे त्याचं स्वतःच सत्यवादी मन होय!गायीच्या दुधाची चोरी करतांना आपण काल या मालकासाठी कसलं लाजिरवाणं काम केलय याचा विसर पडतो आणि मालक स्वतः दुध देईन म्हणाला होता हे साजबा विसरतो, छोट्या चोरीसाठी त्याचं मन खात जे खर तर त्याच्या कष्टां चीज असत ते न स्विकारता विचारांची जी योग्य दिशा असते तीच त्याच्या अंतरंगात वसत असते हे लक्षात येत.दिनीची साथ म्हणजे खरी जीवनसाथिदार असल्यची साक्ष. पाटलिन म्हणून जगलेल्या दिनीवरची ही वाईट वेळ पाहून साजबा सतत दुखः वाटून घेतो जे दिनीच्या गावीही नसते. नविन गावात प्रवेश करण्यासाठी जी टेकडी पार करून साजबा भुकेनं शुध्द हरपलेल्या दिनीस आणि सुभण्यास काळूबाईच्या मंदिरात आणतो तेंव्हा अख्ख गाव बघतच राहत! ते त्यांच्यासाठीच जगण्याच आश्चर्यच असत. कारण भुतटेकडी पार करण दिव्यत्वाचं नव्हे तर दैवत्वाचं हा त्यांचा ठाम विश्वास आणि हे पार पाडणारा त्यांचं जीवन उध्दारणारा. त्या सर्वांचा कुठलाच विचार नसणारा साजबा फक्त पोटाची खळगी भरावी आणि सुभण्यास वाटीभर दुध मिळावे ह्या चिंतेतच जगत असतो. त्याला कुठलीही गोष्ट फुकट नको आहे कष्टाची मात्र नेहमी तय्यारी आहे. लेखकांनी दिनीचं वर्णन थोड तरी मांडल पण साजबाचं वर्णन कुठेच नाही पण पुस्तक वाचतांना सजाबा हे व्यक्तित्व अस लिहिल आहे की नकळत सजाबा आपण आपल्या या पुस्तकाच्या जगात चित्रित स्वतः वाचकच करतो! इतकं विलक्षण जगण साजबाचं आहे की आपण सतत त्याच्या स्वभावाबद्दल, जगण्याच्या दृष्टिकोनाबद्दल आणि घडत असलेल्या घटनांबद्दल संचित होतो, पुढे काय.. ही उत्सुकता खिळवून ठेवण्याची लेखनशैली या पुस्तकात नक्कीच ओतप्रोत भरली आहे. पुस्तक एका दमात वाचक संपवतो हे नक्की! फार कमी पुस्तकांना हे साधत.

एक बाप माणूस कुटूंबाच्या जगण्यासाठी स्वतःच जगण कस बदलत जातो याचं उत्तम उदाहरण म्हणजे सुर्याची सावली होय. पुस्तकाच्या सुरूवातीसच लेखक सुर्याची सावली या पुस्तक नावासाठी स्पष्टिकरण देतात की पहिले पुस्तक जे बाप म्हणजे सुर्य आणि आई म्हणजे सावली ह्यावरुन हे नाव दिले जे त्यांच्या स्वजगण्यात आहे. मुखपृष्ठ अतिशय चांगल्या प्रकारे पुस्तकाबद्दलचे मर्म साधते अवघे १६८ पानाचे हे पुस्तक हातात पडल्यास संपेपर्यंत हातातच राहते हे नक्की!

साजबाची भुतटेकडी पार करणे गावालगतच्या मंदीरात राहणे आणि तेथिल जगण्यासाठी काम शोधणे यात कुठेतरी त्याच्यातील माणूसकीच्या कष्टाच्या जगण्याला आणि प्रामाणिक तत्वांना देवत्व प्राप्त होते आणि म्हातारी मुळे तो महाराज बनतो. सुभण्याचा ताप कमी व्हावा यासाठी लागणारी इंजेक्शनस आणि डॉ. फी , औषधं यासाठी हा बदल तो तात्पुरता स्विकारतो परंतु नंतर लक्षात येतं तो यात पुर्णपणे अडकत चालला आहे. एक वाचक म्हणून त्याच हे अडणं आपल्यास त्याच्या जगण्यात गुंतवून ठेवत त्याचबरोबर अस्वस्थ पण करत जात! लग्नाअगोदरची शिक्षणातील साजबाच जगण लेखक छान मांडतात. अंधश्रध्देची प्रचंड चीड असणारा, स्वकष्टावर स्वशिक्षण घेणारा सजाबा एक सुशिक्षित तरूण आहे हे नकळत लेखक सांगत राहतात ,वर्तमानकाळातून भूतकाळ सहजपणे स्पष्ट करत सजाबातील चांगल्या गुणांना लेखक आपल्या मनात अधोरेखित करतात. दिनीची साथ जी आहे नकळत आपण तिच्या सजाबाच्या जीवनातील अस्तित्वाला समर्पकता साधते हे वाचत असतांना लक्षात येत. बाप हा सुर्य आहे तर आई ही नक्कीच दिनीरूपात जीवनाची सावली आहे हे वाटून जातं. तळपणारा साजबा म्हणजे स्वतःच्या विचारांना तेजस्वी ठेवत स्वतःला त्रास करून जगण्यावर मात देणारा आहे. स्वतःचे विचार सत्य ठेऊन असलेल्या औषधींचं ज्ञान तो योग्य प्रकारे सगळ्यांना देतो पण नकळत गाववासियांची जी अंधश्रध्दा आहे तिला खतपाणी घालत राहतो! त्याला जगण्यासाठी जीवनासाठी पर्याय पण राहत नाही. प्रामाणिक साजबा मुलाच्या तापेच्या फीस औषधासाठी पाटलिन ला फक्त १५० रु, मागतो आणि जवळपास पन्नास हजारांचे दागिने नाकारतो तेंव्हा गाव अचंबित होतो. खरतरं सजाबाच्या व्यक्तिमत्वातील ही सत्य जगण्याची वृत्ती असते पण तीच वृत्ती त्यास महाराज बनण्यास भाग पाडते. समाजात पैश्यासाठी भोंदूगिरी करणारे आहेत पण प्रामाणिक असणाऱ्या साजबास त्याच्या निर्मळ जगण्यामुळे महाराज व्हावे लागते. साजबा बेशुध्द वानरावर वनऔषधी लावतो त्याच्या जखमेतील अळ्या काढून टाकून त्याची काळजी घेतो यामध्ये दिनीची पण तेवढीच साथ होते आणि हा भाग वाचतांना नकळत घडत असलेल्या या संचीत कर्माचे फळ या दोघां पति पत्नीस मिळणार हे लक्षात येते. वानर बरे होते आणि माणसांपेक्षा मुक्या जनावरात माणूसकीचे नाते जास्त जगता येते हे लक्षात येते.साजबा, दिनी आणि सुभण्यासोबत एक घरचा सदस्य बनून वानर राहते. त्याच्या या कुटूंबातील अस्तित्वास परत लोक वेगळे स्वरूप देतात. लक्षात येत जीवन हे लोकापवादात कस गुंतल जात आणि जगण्याची दिशा कशी बदलली जाते. स्वतःचे विचार सांभाळत महाराज बनुन हळद कुंकू माखत जोरात काही तरी आरोळी देत सजाबा जे काही समस्याधारकांच्या समाधानासाठी करतो त्या पाठीमागे फक्त आणि सुभण्यास चांगल जगण मिळावा हा प्रयत्न असतो. म्हातारबुवांच दिनीसोबतच बैलगाडीतून प्रवास करण सतत तिच्यासाठी थांबण लक्षात येतं हे जाणूनबुजून आहे,माणूसकीचं आहे. म्हातारबाबाच्या घरी जो जेवणाचा प्रसंग आहे क्षणभर वाचकाची भंबेरीच उडून जाते, नकळत हा भुत तर नाही या कथेतला असे वाटून जातं लेखकांनी त्यांना खविस म्हणून संबोधल जे आपणास सत्यच वाटून जातं परंतु काही क्षणातच त्यातील दुःखी पित्याचा अंश समोर आणण्यात लेखक यशस्वी झालेत. यावरुन लक्षात येत अंधश्रध्दा ही किती टोकापर्यंत जाऊ शकते आणि माणसास माणूस म्हणून जगण्यास त्रासदायक घडते.आता कूटूंबात साजबा, दिनी, सुभण्या , मारोतीबाबा, आणि म्हातारबाबा असतात. या परिस्थतीनी एकत्र आलेल्या कुटूंबास गाव परत दैवी जगण म्हणत. साजबा फक्त महाराज नाही राहत तर तो आता दैवीपूरूष आहे हे लोकांच्या मनात ठाम बसत. गावपाटील साजबाच्या जगण्याला एक वेगळ स्वरूप देतो त्याच गाव अस्तित्व त्याच घर बांधून आणि शाळा बांधून तेथेच बांधून ठेवतो. परिणाम चांगला पण आणि वाईटपण होतो. साजबा आता पुर्णपणे अडकतो. स्वतःच मन त्याला खात असत पण गावकऱ्यांची अंधश्रध्दा निपटून काढण आपल्या हातात नाही हे पण समजून घेतो. पैसे भरपुर येत असले तरी रोजचे फक्त पाचच रू. आपले असावेत हा दिनीचा दृष्टिकोन तिच्यातील स्वाभिमानी सत्य स्त्री चा जगण्याचा निर्मोही दृष्टिकोन लक्षात येतो. साजबाच्या मनस्थितीस सतत समजून घेत जगणारी दिनी म्हणजे खरी त्याच्यातील तळपत्या अस्तित्वाची थंड सुखद सावली होय.

ज्या माणसाने वाटीभर दुधासाठी हागणदारी स्वच्छ करण्याचे काम साजबाकडून करवुन घेतले त्यास अंगात वारं आलय म्हणून त्याची घरधनीन आणि वडील घेऊन येतात , तेंव्हा साजबा त्यास त्याने त्यास वाटीभर दुध दिले सुभण्यास जगण्यासाठी हे जीवतोडून आठवण करुण देतो आणि महाराजांना आपण असले काम करावयास लावले होते हे स्मरुन तो माणूस बेभान होऊन एकदम जागृत होऊन रडायला लागतो. या घटनेतून साजबाची प्रसंगावधानात वापरलेली योग्य बुध्दी आहे जी पाटलाच्या मेंदूपर्यंत पोहंचण्याचं काम करते परंतू इथे परत तो दैवी महाराज ठरतो.

सुभण्या मोठा होत चालला त्याला शाळेत सोडायला व आणण्यास जाणाऱ्या म्हातारबाबांच त्यावर बारिक लक्ष असत.साजबाची ही वाढती प्रसिध्दी, टेकडीच्या त्याच्या घराकडे जाणारा रस्ता पाटील करून देतात, पुल बांधून होत, लोक तीन-तीन दिवस महाराजांच्या दर्शनासाठी वाट पाहुन राहतात. एक सत्कर्मी व्यक्तीला त्याच जगण भोंदू व्यवसायात कस ओढत जात हे लेखकांनी अचुक गोष्टीत नमूद करत गेलेत. म्हातारबाबांना समजतं सुभण्या बापाच्या तळपत्या अस्तित्वाखाली आता होरपळला जाणार. ज्या चांगल्या जगण्यासाठी, स्वदृष्टिकोणासाठी सुभण्यास शाळेत चांगल शिक्षण भेटावं तो एक उत्तम विध्यार्थी बनावा म्हणून साजबा रोजचं त्याच जगणं जगत असतो त्या सुभण्यास आता त्याच्या महाराजगिरीमुळे विशेष जगणं मिळत आणि इथेच धोक्याची सुरूवात होते. सुभण्या मुळातच खुप हुशार आणि जागृत. अंधश्रध्दा विषय शाळेत शिकवू लागले की त्यास बापाच्या कामाची लाज वाटे पण जेंव्हा त्याच बापामुळे त्याने काही जरी केले तर शिक्षा न मिळता न कळत त्यालाच महत्व दिले जाते हे त्याच्या लक्षात येते...हाच सगळ्यात चुकीचा दृष्टिकोन आता सुभण्यात संस्कारित होत आहे हे लक्षात येत. मारोतीच्या मरणानंतर साजबाची जी संतापाची उतराई होते ती खरी त्याच्यातील अस्तित्वाची असते. भोंदूपणाची चीड आणि लोकांची अंधश्रध्दा एका वानराचे केस उपटण्यापर्यंत कशी पसरते आणि नकळत यास आपण कारणीभूत आहोत हा संताप त्यास त्रास देऊन जातो. लेखकांनी हा प्रसंग अतीशय उत्तमरित्या मांडला असून साजबाच्या जगण्यातील अगतिकता समोर येते आणि श्रध्दा अंधश्रध्देतील फरक समोर येतो. मानवी जीवन हे असेच भरकटलेले आहे जे जगण्यातील खऱ्या जगण्यास मोल देत नाही मात्र खोट्या जगण्यस अनमोल बनवते आणि जीवनाचं रूपांतर संकल्पनेत मांडत जाते. म्हातारबाबांना सगळं लक्षात येत असत वेळीच साजबास त्यांना सगळ सांगून सुभण्यासाठी सावध करायच असत परंतू घटना अश्या घडत जातात की ते सांगणच खुंटून जात. अंधश्रध्देच्या जगात स्वतःचा दृष्टिकोन जगतांना ज्या साजबा आणि दिनीचा एकच ध्यास असतो , सुभाण्याचं जगण ! त्याचं अस्तित्व तय्यार करण ह्या सर्व गोष्टीपासून त्यास दूर ठेऊन त्याची बुध्दी व्यापक करण, तेच उलटं घडतं जात!

जीवनाचा उचित दृष्टिकोन समजण्याअगोदर सुभण्या वेगळा बनत जातो. पाटिल साजबास सर्व पैश्याचा हवाला देतो. साजबा सर्व पैसे मोजदाद करून सुभण्या चा डॉ. होण्यासाठीचा खर्च लिहुन काढतो त्यासाठी लागणारे वर्ष आणि पैसे यांचा आराखडा करतो. सुभण्या डॉ. बनावा यासाठी जे लागणार ते तो करणार असतो. मात्र नियतीची वाटचाल वेगळीच घडते. तळपत्या सुर्यासारखा अखंड जळणारा साजबा हा लोकअंधश्रध्देच्या दबावाखाली पुर्णपणे नामशेष होण्याच्या मार्गावर पोहंचतो ! त्याच जगणच संयमी, शांत विचारी आणि मजबुत प्रामाणिक विचारांच असत फक्त तो जे काही महाराज म्हणून जगून जातो ते पोटाची खळगी भरावी आणि पोराचं चांगल शिक्षण व्हाव! अस जगण त्याला लोकांमुळे जगण्यास गत्यंतर नव्हत पण आता ते त्याच्यावरच त्याच्या मुलाबाबतच्या स्वप्नावरच उलटत जातं.

सुभण्या बुध्दिमान त्यातच बापाच्या महाराजगिरीमुळे त्याच्या भोवती तय्यार झालेले वलय त्यास स्वअस्तीत्व करण्याची वेगळी दिशा मिळते ! जी कमी वयात खुप मोठी वाटते. भरकटलेल्या लोकांना मार्गी लावण्यासाठी ज्या सुभण्याच्या शिक्षणावर साजबाची मदारअसते तीच अंधश्रध्देखाली आणि लोकभ्रमाखाली तुडवली जाते. म्हातारबाबांचा मृत्यु जीवाला कातर बनवून जातो पण त्यांना अग्नी देण्याच काम त्यांच्या नातीकडून रिध्दीकडून नकळत घडून जाते. लेखकांनी व्यक्तींची आणि प्रसंगाची योग्य सांगड घालत घटनाक्रम लिहिला जो नक्कीच स्तुत्य होय. सर्वांगिण विचार करता पुस्तकाचा असा आराखडा नक्कीच कौतुकास्पद असुन डोळ्यात अंधश्रध्दा निर्मुलनाचे झणझणित अंजन घालणारा आहे.

काळुबाईच्या नावानं चांगलभलं
गोंजीब्बाच्या नावनं चांगलभलं
मांगीरब्बाच्या नावानं चांगलभलं
साजबा महाराजांच्या नावांन चांगलभलं
सुभाण महाराजाच्या नावानं चांगलभलं .

हा आवाज आसमंत उजळून काढत होता!

....सुभाण महाराज पालखीत निघतात लोक पादस्पर्शासाठी गर्दी करतात....

साजबाचातील अगतिक पिता मारोतीबाबाच्या समधीवर कलंडतो आणि शेवटचा श्वास घेतो! त्याच वेळी त्याच्या हातातील वही पडते जी सुभण्यासाठीच्या जगण्याठीची त्याच्या स्वप्नपुर्ततेसाठी असते! एका तळपत्या बापाची ही पराकाष्टा आपणास मन सुन्न करुन जाते आणि मानवी जीवनातील अंधश्रध्देस लोक माथ्यावर घेऊन कसे आयुष्य उठवून लावतात हे लक्षात राहते! राज्यशासन पुरस्कार कादंबरी आहे ही.. ह्या पुस्तकाची संरचनाच अशी आहे की मनाच्या अस्तित्वाची भुमिका मांडत विचारांच जगण हे पुस्तक देतं! लेखकाचं पहिलं पुस्तक आहे.. नक्कीच वाचनिय आहे!

एक श्रध्दा अंधश्रध्देतील दृष्टिकोन तळपत्या पित्याच्या छत्रछायेखाली दर्शवनं नक्कीच.. स्पहनिय!

सुर्याची सावली.

लेखक. नितीन थोरात,प्रकाशन. न्यू ईरा.

अर्चना सिध्देश्वर पैके.-९४२०४३५०८१

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

चंदेरी दुनिया
चंदेरी दुनिया

अमिताभ बच्चन यांचा जावई कोण? कपूर घराण्यासोबत आहेत खास कनेक्शन



मुंबई २० मार्च (पीएसआय)

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन सिनेमांसह वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असतात. संपूर्ण बच्चन कुटुंब फिल्मी जगात सक्रीय आहे. आता त्यांची मुलगी श्वेता बच्चन सिनेमांपासून दूर असली तरी कायमच चर्चेचा भाग असते. श्वेताचा पती बि बींचा जावई निखिल नंदा मात्र लाईमलाईटपासून दूर आहेत. अमिताभ बच्चन यांचा जावई कोण आहे? काय करतो हे जाणून घेण्याची चाहत्यांना उत्सुकता आहे.

अमिताभ बच्चन यांचा जावई निखिल नंदा प्रसिद्धीपासून दूर आहे. पण उद्योगक्षेत्रात त्यांचे चांगलचं नाव आहे. निखिल नंदा यांचं कपूर घराण्यासोबत खास कनेक्शन आहे. उद्योगपती असलेले निखिल नंदा खूपच श्रीमंत आहेत.

कोण आहे निखिल नंदा?

निखिल नंदाचा जन्म १८ मार्च १९७५ रोजी दिल्लीत झाला आहे. निखिलच्या वडिलांचं नाव राज नंदा आहे. बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता, सिनेदिग्दर्शक, निर्माते राज कपूर यांची मुलगी ऋतु कपूर यांच्यासोबत राज नंदा लग्नबंधनात अडकले. निखिल नंदा हे राज कपूर यांचे नातू आहेत. १९९७ मध्ये ते अमिताभ बच्चन यांचे जावई झाले.

अमिताभ बच्चन यांचा जावई सिनेसृष्टीपासून दूरनिखिल नंदा सिनेमांत काम करत नसले तरी सिनेसृष्टीसोबत त्यांचं खूप जुनं नातं आहे. अमिताभ बच्चन यांनी त्यांची लाडकी लेक श्वेता बच्चनचं लग्न १९९७ मध्ये इस्कॉर्ट कंपनीचे मालक राजन नंदा यांचा एकुलता एक मुलगा निखिल नंदासोबत लावलं होतं. निखिल नंदा आणि श्वेता बच्चन यांना दोन मुलं आहेत. नव्या नवेली आणि अगस्त्य नंदा अशी त्यांच्या मुलांची नावे आहेत. नव्या पॉडकास्ट चालवते. तसेच काही सामाजिक संस्थासोबतदेखील ती जोडली गेली आहे.अगस्त्यने 'द आर्चीज' या सिनेमाच्या माध्यमातून २०२३ मध्ये बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. रणधीर कपूर, ऋषी कपूर आणि राजीव कपूर यांचा भाचा निखिल नंदा दिल्लीतील एक लोकप्रिय उद्योगपती आहे. एस्कॉर्ट्स लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून ते ट्रॅक्टर बनवतात. या व्यावसायासह त्याचे अनेक व्यावसाय आहेत. निखिलचे वडील राजन नंदा यांचे २०१८ मध्ये निधन झाले. त्यानंतर संपूर्ण व्यवसायाची जबाबदारी निखिल यांच्या खांद्यावर आली. निखिल नंदा यांचं कपूर घराण्यासोबत खास कनेक्शन

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांची मुलगी श्वेता बच्चनचे पती निखिल नंदा आहेत. राज कपूर यांची मुलगी ऋतू कपूर नंदाच्या एकुलत्या एक मुलाचं नाव निखिल नंदा आहे. रणधीर कपूर, ऋषी कपूर आणि राजीव कपूर हे निखिल नंदाचे मामा लागतात. त्यामुळे करिश्मा कपूर, करीना कपूर आणि रणबीर कपूर हे निखिलच्या मामांची मुले आहेत.

निखिल नंदा काय काम करतात?

निखिल नंदा यांचे शालेय शिक्षण देहरादून येथील एका शाळेत झाले आहे. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले. निखिल नंदा यांची वित्त आणि मार्केटिंग या क्षेत्रात सक्रीय आहेत. एस्कॉर्ट्स लिमिटेड या कंपनीचे ती संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. १९४४ रोजी या कंपनीची स्थापना झाली आहे. कंस्ट्रक्शन संबंधित गोष्टी या ट्रॅक्टर निर्मितीची कामे या कंपनीत केली जातात. हे सामान विदेशातदेखील एक्सपोर्स केले जाते.

लवकरच आई होणाऱ्या दीपिका पदुकोणने शेअर केला दुर्मिळ सेल्फी, रणवीरनेही दिली उत्स्फूर्त प्रतिक्रिया



मुंबई -पहिल्या मुलांची आई होणार असलेल्या अभिनेत्री दीपिका पदुकोणने सलूनमधून केस कापतानाचा सेल्फी शेअर केला आहे. दीपिकाने मंगळवारी इंस्टाग्रामवर फोटो शेअर केला आणि नेहमीप्रमाणेच रणवीरनेही त्यावर अतिशय आकर्षक प्रतिक्रिया दिली आहे.

फोटोमध्ये दीपिका खुर्चीवर बसलेली दिसत आहे तर कोणीतरी तिचे केस कापण्यासाठी नीट करत आहे. तिचा हा फोटो काढताना दीपिकाच्या चेहऱ्यावर हसू उमटलं आहे. सेल्फीमध्ये दीपिकाने निळ्या रंगाचा शर्ट परिधान केलेला दिसतो. दीपिकाने फोटोसाठी कॅप्शन दिलेले नाही, परंतु हॅशटॅगचा समावेश केला आहे, ''मला माझे लांब केस आठवतात.'' तिने केस कापणाऱ्या महिलेचे इमोजी आणि हसरा चेहरा देखील जोडला आहे.कमेंट सेक्शनमध्ये रणवीरने फोटोवर प्रतिक्रिया देताना लिहिले, ''क्यूट''. त्याने एका महिलेचे केस कापलेले आणि दोन हृदयाचे इमोटिकॉन देखील अपलोड केले. दीपिका आणि रणवीर आता आई बाबा होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. दोघांनाही अलीकडेच गुजरातमधील जामनगर येथे अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या विवाहपूर्व समारंभात सहभागी होताना पाहिले होते. या प्रसंगी या जोडप्याने नृत्य केले आणि काही सुखद क्षणही अनुभवले.या वर्षाच्या फेब्रुवारीमध्ये या दोघांनी इंस्टाग्रामवर खुलासा केला होता की ते लवकरच पालक होणार आहेत. त्यांनी ''सप्टेंबर २०२४'' लिहिलेला एक फोटोही शेअर केला आणि त्यात लहान मुलांचे शूज आणि कपडे दाखवले होते. दीपिका आणि रणवीरने २०१८ मध्ये इटलीतील लेक कोमो येथे एका खासगी समारंभात लग्न केले होते.

कामाच्या आघाडीवर, हे जोडपे आगामी रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन'मध्ये दिसणार आहे. यामध्ये अजय देवगण मुख्य भूमिका साकारत आहे. त्यांनी यापूर्वी 'राम-लीला', 'बाजीराव मस्तानी' आणि '८३' सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले होते.

दीपिका नुकतीच हृतिक रोशन अभिनीत 'फायटर' या एरियल ॲक्शन थ्रिलरमध्ये दिसली होती. सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित या चित्रपटात अनिल कपूर, करण सिंग ग्रोव्हर आणि अक्षय ओबेरॉय यांनीही प्रमुख भूमिका केल्या होत्या. दीपिका आगामी 'कल्की २८९८ एडी'मध्ये या साय-फाय ॲक्शन थ्रिलर चित्रपटात प्रभासबरोबर दिसणार आहे. नाग अश्विन दिग्दर्शित आणि अमिताभ बच्चन अभिनीत हा चित्रपट ९ मे २०२४ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

दुसरीकडे, रणवीर रोहित शेट्टीच्या 'सिंघम अगेन' या कॉप ड्रामामध्ये 'सिम्बा'च्या भूमिकेत पुन्हा दिसणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, टायगर श्रॉफ आणि करीना कपूर यांच्याही भूमिका आहेत. रणवीरकडे फरहान अख्तरचा 'डॉन ३' देखील आहे.

हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण स्टारर फायटर ओटीटीवर प्रदर्शित



मुंबई,२१ मार्च (पीएसआय)

अभिनेता हृतिक रोशन आणि अभिनेत्री दीपिका पदुकोण स्टारर 'फायटर' या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केल्यानंतर आता ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. 'फायटर' चित्रपट २५ जानेवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटानं रुपेरी पडद्यावर चांगली कामगिरी केली होती. याशिवाय समीक्षकांकडूनही या चित्रपटाला भरभरून प्रेम मिळालं आहे. आता ज्या प्रेक्षकांनी 'फायटर' चित्रपट थिएटरमध्ये पाहिला नाही, त्यांच्यासाठी एक आनंदाची बातमी आली आहे.

हा चित्रपट २१ मार्च रोजी रात्री १२ वाजता स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर रिलीज झाला आहे. स्ट्रीमिंग व्हर्जनमध्ये थिएटरच्या रिलीजमधून काढलेले सीन देखील दाखवले जाणार आहे.

नेटफ्लिक्सनं शेअर केली पोस्ट :

नेटफ्लिक्स इंडियाच्या इंस्टाग्राम हँडलवर २० मार्च रोजी म्हणजेच बुधवारी या चित्रपटामधील एक व्हिडिओ शेअर करत त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं होतं, ''लेडीज अँड जेंटलमेन, फायटर लँडिंगसाठी तयार आहे, 'फायटर' आज रात्री १२ वाजता नेटफ्लिक्सवर रिलीज होत आहे. या चित्रपटामध्ये हृतिक रोशन, दीपिका पदुकोण व्यतिरिक्त अनिल कपूर, करण सिंग ग्रोव्हर, अक्षय ओबेरॉय, तलत अझीझ , संजीदा शेख, आशुतोष राणा आणि इतर कलाकार दिसले आहेत. 'बँग बँग' आणि 'वॉर' नंतर हृतिक रोशनचा आणि सिद्धार्थ आनंद यांच्याबरोबरचा तिसरा एकत्रित चित्रपट आहे.

ओटीटी स्ट्रीमिंगवर हृतिक रोशननं शेअर केली पोस्ट :

हृतिक रोशननं या चित्रपटाबद्दल म्हटलं होतं, ''फायटर हा चित्रपट भारतीय वायुसेनेला आमची सलामी आहे आणि नेटफ्लिक्सवर स्ट्रीम होत असताना, मी प्रेक्षकांच्या प्रतिक्रियेची वाट पाहत आहे. मला आशा आहे की प्रेक्षकांना 'फायटर' आवडेल.'' 'फायटर' हा चित्रपट २५० कोटींच्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. या चित्रपटाचे निर्माते सिद्धार्थ आनंद व्यतिरिक्त रमोन चिब, अजित अंधरे, अंकू पांडे, केविन व्हाझ, ममता भाटिया हे आहेत. दरम्यान, हृतिक रोशनच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर तो रणबीर कपूर बरोबर 'रामायण'मध्ये दिसणार आहे. याशिवाय तो 'वॉर २' आणि 'क्रिश ४'मध्ये झळकणार आहे.

यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

टि.सी. हरवली आहे

सतिश हरीचंद्रा वागदरीकर या नावाची १० वी पासची मुळ टिसी दि.१५/०३/२०२४ रोजी वागदरी ते उदगीर बस मध्ये प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क साधावा
संपर्क:-९४२१३०९५८४

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि - ४३
दि.११/०१/२०२४

अर्जदारः- श्री. जंपनगिरे नामदेव सोमनाथ
विरूध्द
गैरअर्जदार मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरगाव ।
अर्ज :- कलम १३(३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा,

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. जंपनगिरे नामदेव सोमनाथ रा. बोरगाव ता. चाकुर जि.लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार याचा स्वताःचा जन्म दि. २६/०६/१९७६ राहात्या घरी झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनीमुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव ता.चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावयात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पादीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि १२/०३/२०२४
पुढील तारीख १२/०४/२०२४

आदेशावरून
तालुका दंडाधिकारी तथा
तहसील कार्यालय, चाकुर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि. १४/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार हाशमी इनामुल हस्सन सय्यद लईक रा. मोमीनपुरा उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०४/०७/१९९७ रोजी मौजे उदगीर तालुका उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार हाशमी इनामुल हस्सन सय्यद लईक रा. मोमीनपुरा उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०४/०७/१९९७ नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ११/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०४/०७/१९९७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार हाशमी इनामुल हस्सन सय्यद लईक रा. मोमीनपुरा उदगीर यांचा जन्म दिनांक ०४/०७/१९९७ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म- मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १४/०३/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख १५/०४/२०२४
- तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२८/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार इफ्तेखार अब्दुल करीम पिंचनी रा. किल्ला गल्ली उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार इफ्तेखार अब्दुल करीम पिंचनी रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २८/०२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

. त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार इफ्तेखार अब्दुल करीम पिंचनी रा. किल्ला गल्ली उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २८/०२/२०२४रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २९/०३/२०२४

- तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.१४/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार अनिस बेगम अब्दुल रहमान रा. मोमीनापुरा उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक १०/०९/१९७२ रोजी मौजे उदगीर तालुका उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार अनिस बेगम अब्दुल रहमान रा. मोमीनापुरा उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक १०/०९/१९७२ नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ११/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०९/१९७२ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार अनिस बेगम अब्दुल रहमान रा. मोमीनापुरा उदगीर यांचा जन्म दिनांक १०/०९/१९७२ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १४/०३/२०२४ रोजी दिले
पूढः नेमलेली तारीख १५/०४/२०२४

- तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि.
दि.१९/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार चंद्रशेखर व्यंटकराव पाटिल रा. आवलकोंडा ता. उदगीर यांची मुलगी नामे श्रध्दा चंद्रशेखर पाटिल यांचा जन्म दि.०५/०८/२००६ रा.आवलकोंडा यांचा जन्म ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार यांचा मुलगी नामे श्रध्दा चंद्रशेखर पाटिल जन्म दि.०५/०८/२००६ नोंद आवलकोंडा ता.उदगीर यांनी जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणे बाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १२/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा मुलगी नामे श्रध्दा चंद्रशेखर पाटिल यांचा जन्म दिनांक ०५/०८/२००६ या तारखेस झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार चंद्रशेखराव्यंटकराव पाटिल रा. आवलकोंडा यांच्या मुलगीचा जन्म दिनांक ०५/०८/२००६ रोजीची नोंद .उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल,

आज १९/०३/२०२४:रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २०/०४/२०२४
तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार शेख अखिल अहमद मुस्तफा रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०२/१९९४ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार शेख अखिल अहमद मुस्तफा रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०५/०२/१९९४ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १८/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५/०२/१९९४ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणनें दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे शेख अखिल अहमद मुस्तफा रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०२/१९९४ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २१/०४/२०२४

- तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि. १४/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार रफिक अहेमद बशीर अहेमद सिद्दीखी रा. मोमीनपुरा उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९७१ रोजी मौजे उदगीर तालुका उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार रफिक अहेमद बशीर अहेमद सिद्दीखी रा. मोमीनपुरा उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९७१ नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ११/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९७१ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार रफिक अहेमद बशीर अहेमद सिद्दीखी रा. मोमीनपुरा उदगीर यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९७१ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म- मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १४/०३/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख १५/०४/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.१५/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार जाफरी नसीम कौसर मोहम्मद अमीरुद्दीन रा. हिन्दुस्तान कॉलनी खैरनगर उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९६८ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार जाफरी नसीम कौसर मोहम्मद अमीरुद्दीन रा. हिन्दुस्तान कॉलनी खैरनगर उदगीर ता. उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९६८ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १२/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९६८ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे जाफरी नसीम कौसर मोहम्मद अमीरुद्दीन रा. हिन्दुस्तान कॉलनी खैरनगर उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०२/०२/१९६८ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १५/०३/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख १६/०४/२०२४

- तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार शेख गौस अहमद मुस्तफा अहमद रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक २०/०३/१९८५ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार शेख गौस अहमद मुस्तफा अहमद रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक २०/०३/१९८५ रोजीची नाँद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १८/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २०/०३/१९८५ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे शेख गौस अहमद मुस्तफा अहमद रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक २०/०३/१९८५ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २१/०४/२०२४
तालूका दंडाधिकारी तथा
तहसीलदार उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार पठाण शहेनाजबेगम अब्दुल मजीदखान रा. आझाद नगर उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०२/१९७१ रोजी मौजे उदगीर तालुका उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार पठाण शहेनाजबेगम अब्दुल मजीदखान रा. आझाद नगर उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०२/१९७१ नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २९/०२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

